**डॉ बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठामार्फत चालविण्यात येणारा मत्स्य विज्ञान (B.F.Sc.) अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेचे नियम लागू करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक मपवि २०१८/प्र.क्र. ६७/म्हापसू**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-३२.
दिनांक : १८ जून, २०१८

**संदर्भः-**
१. कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्र. मकृवि २०१०/प्र.क्र.१५५/ ७ अे, दि.२०/१०/२०११
२. महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम,२०१५.
३. कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्र. मपवि २०१७/प्र.क्र.५७/म्हापसू, दि.९/८/२०१७ व दि.२३/२/२०१८
४. कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, अधिसूचना दि.२३/२/२०१८
५. कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्र. मपवि २०१७/प्र.क्र.५७/म्हापसू, दि.२३/२/२०१८
६. कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, अधिसूचना दि.१/६/२०१८

**प्रस्तावनाः-**

वरील संदर्भ क्र. २ येथील अधिनियमांतर्गत संदर्भ क्र. ३ येथील दिनांक ९/८/२०१७ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे महाराष्ट्र विना अनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम,२०१५ मधील कलम २ (द) अनुसार विभागाच्या अखत्यारीतील मत्स्यविज्ञान (Fishery) हया पदवी अभ्यासक्रमास व्यावसायिक शिक्षणांतर्गत येणारा अभ्यासक्रम व्यावसायिक अभ्यासक्रम म्हणून घोषित केला आहे.

कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाच्या संदर्भाधीन क्र ४ येथील दिनांक २३/२/२०१८ रोजीच्या अधिसूचनेद्वारे मत्स्यविज्ञान हया पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशाच्या अटी व शर्ती विनिर्दिष्ट केलेल्या आहेत. कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाच्या संदर्भाधीन क्र ५ येथील दिनांक २३/२/२०१८ च्या शासन निर्णयान्वये, दिनांक २३/२/२०१८ रोजीच्या अधिसूचनेद्वारे घोषित व अधिसूचित करण्यात आलेल्या व्यावसायिक शैक्षणिक अभ्यासक्रमांसाठी सामायिक प्रवेश परीक्षा आणि प्रवेश प्रक्रिया उक्त अधिनियमाच्या कलम २३ अन्वये तयार करण्यात आलेल्या नियमातील तरतुदीनुसार आयुक्त, सामायिक प्रवेश परीक्षा तथा सक्षम प्राधिकारी यांच्या स्तरावरून राबविण्याबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे. कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, संदर्भाधीन क्र ६ येथील दिनांक १/६/२०१८ च्या अधिसूचनेन्वये कायम विना अनुदानित व्यावसायिक कृषी,

उद्यानविद्या, वनशास्त्र, कृषी अभियांत्रिकी, अन्नतंत्र, जैवतंत्रज्ञान, सामाजिक विज्ञान यामधील पदवी पाठ्यक्रमाची प्रवेश नियमावली प्रसिध्द करण्यात आली आहे.

उपरोक्त अधिसूचना व प्रवेश नियमाच्या धर्तीवर शासकीय मत्स्यविज्ञान पदवी अभ्यासक्रमाचे प्रवेश हे सामायिक प्रवेश परीक्षेद्वारे व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे करण्याबाबतची नियमावली प्रसिध्द करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय:-</u>**

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून संदर्भाधीन क्र. ६ येथील दिनांक ०१/६/२०१८ रोजीच्या अधिसूचनेद्वारे कायम विना अनुदानित व्यावसायिक कृषी, उद्यानविद्या, वनशास्त्र, कृषी अभियांत्रिकी, अन्नतंत्र, जैवतंत्रज्ञान, सामाजिक विज्ञान यामधील पदवी पाठ्यक्रमाची प्रवेश नियमावली डॉ बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठामार्फत चालविण्यात येणारा मत्स्य विज्ञान (B.F.Sc.) अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी लागू करण्यात येत आहे.

तसेच संदर्भाधीन क्र. ६ येथील दिनांक १/६/२०१८ च्या प्रवेश नियमातील प्रवेश प्रक्रियेचा अवलंब करून शासकीय मत्स्यविज्ञान पदवी अभ्यासक्रमाचे प्रवेश हे सक्षम प्राधिकारी म्हणून आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष यांच्यामार्फत सामायिक प्रवेश परीक्षेद्वारे व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे एक खिडकी पध्दतीने करण्यात येतील.

सदर शासकीय मत्स्यविज्ञान पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी जागांचे वाटप, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाच्या संदर्भाधीन क्र. १ येथील दिनांक २०/१०/२०११ मध्ये नमूद केल्याप्रमाणे उपरोक्त सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत करण्यात येईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०६१९१२५५१४३५०१ असा आहे, हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Vikas Tulshiram Kadam

Digitally signed by Vikas Tulshiram Kadam
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture and ADF Dept, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9869ec61c857e78e82b7a19b04c6d22f8ef1b8dbc9b19d45ef776d80ef148059, cn=Vikas Tulshiram Kadam
Date: 2018.06.19 12:54:49 +05'30'

**(विकास कदम)**

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

(१) आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष तथा सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई
(२) महासंचालक, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, १३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे ४११००७.
(३) मा. मंत्री (कृषी) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
(४) अपर मुख्य सचिव (कृषी), कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
(५) कुलगूरू, डॉ बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली, जिल्हा - रत्नागिरी
(६) प्राचार्य, मत्स्यविज्ञान महाविद्यालय, रत्नागिरी.
(७) निवड नस्ती.